Impact Factor 2.147

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III ISSUE-IX Sept. 2016

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# "बालिका विद्यालयांचे बौद्धिक व व्यक्तिमत्व विकासातील योगदान"

**राठोड दिलीप किशन**
संशोधक विद्यार्थी
शिक्षणशास्त्र संकुल
स्वा.रा.ती.म.वि. नांदेड.

**डॉ. पांडे मिनाक्षी रामचंद्रराव**
सहाय्यक प्राध्यापक,
(संशोधक मार्गदर्शिका),
वसंतराव नाईक अध्यापक महाविद्यालय,
शिरुर ताजबंद.ता. अहमदपूर. जि. लातूर.

**प्रस्तावना :**

मुलींच्या शिक्षणाची प्राथमिकता लक्षात घेऊन केंद्र शासनाने प्राथमिक स्तरावरील मुलींच्या शिक्षणासाठी राष्ट्रीय कार्यक्रम (NPEGE) या नावाने अत्यंत मूलगामी परिणाम घडवून आणण्यास सक्षम असणारा कार्यक्रम सुरु केला आहे. सदर कार्यक्रमांतर्गत प्राथमिक शिक्षणापासून पूर्णपणे वंचित राहिलेल्या तसेच शाळा अर्धवट सोडून निरक्षरतेच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या मुलींकरीता त्यांचे किमान इयत्ता 8 वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण करण्याकरीता कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय ही योजना सुरु करण्यात आली आहे.

सर्व शिक्षा अभियानांतर्गत केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे नवोदय विद्यालयांच्या धर्तीवर व राज्य शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागांच्या शासन निर्णय दिनांक 27 मे, 2008 अन्वये महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्या राज्यस्तरीय नियंत्रणाखाली सुरु असलेली कस्तुरबा गांधी बालिका विद्यालये ही एक शासनाची योजना आहे.

सुरक्षित असणं आणि सुरक्षित वाटणं यामध्ये फरक आहे. KGBV मध्ये निवासी असलेल्या विद्यार्थीनींना सुरक्षा देण्याच्या दृष्टीने भौतिक सुविधा असणे हे तर आवश्यक आहेच. त्याचबरोबर विद्यार्थीनीमध्ये असणारा आंतरिक आत्मविश्वास महत्वाचा आहे. मुलींना स्वत:ला मी सुरक्षित आहे असे वाटणे महत्वाचे आहे. काही अडचण आलीच तर ती त्यातून स्वप्रयत्नातून मार्ग काढावा असा आत्मविश्वास निर्माण करणारी प्रशिक्षणे विद्यालय स्तरावर देण्यात येते.

**कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयांची उद्दिष्ट्ये :**

1) निवासी शाळा नसलेल्या व शैक्षणिक मागास गटातील शाळाबाह्य मुलींना शिक्षणाची संधी मिळणे.
2) अनुसूचित जाती जमाती व आर्थिक मागास वर्गातील मुलींसाठी निवासी व्यवस्थेद्वारे शिक्षण.

**योजनेतील घटक :**

1) निवासी शाळा मुलींची संख्या किमान 100.
2) निवासी शाळेला आवश्यक अशा सर्व सुविधा निर्माण करणे.
3) मूल्यमापन संनियंत्रण यासाठी योग्य व्यक्तीची नेमणूक.
4) मुलींना निवासी शाळेत पाठविण्यासाठी पालकांची मानसिकता घडविणे.
5) किमान 75% मुली अनुसूचित जाती-जमातीच्या 25% मुली दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातून निवड करणे.

**योजना कोणासाठी :**

शाळाबाह्य मुलींची संख्या जास्त, स्त्री साक्षरता कमी असलेल्या विभागात अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्गीय, अल्पसंख्याक जाती जमातीच्या मुलींसाठी.

**उद्देश :**

1) कस्तुरबा गांधी बालिका योजनेची सर्वसामान्यांना ओळख करुन देणे.
2) कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात राबविलेल्या उपक्रमाची माहिती देणे.
3) मुलींनी लिहिलेल्या कथा, कविता, काढलेले चित्र प्रकाशित करण्याची संधी देणे.
4) राज्यातील सर्व कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील मुलींमध्ये समन्वय साधने.
5) राज्यातील सर्व कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयांच्या कार्यपद्धतीत सुसुत्रता आणणे.

**बौद्धिक क्षमता वाढविणारे उपक्रम :**

विद्यार्थीनींचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीने कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात प्रत्येक आठवड्यात सहशालेय सृजनात्मक उपक्रम राबविले जातात.

1) **ग्रंथालयांचा उपयोग :**
कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील विद्यार्थीनींसाठी वाचनालयाची पुस्तके उपलब्ध करुन दिली आहेत. विद्यार्थीनींकरीता त्यांचा नियमित वापर करावा.

2) **चित्रकला/संगीत :**
विद्यार्थीनींची आवड लक्षात घेवून तीन गट करुन संगीत, चित्रकला, व्यवसाय प्रशिक्षण, संगणक शिक्षण व स्पर्धा परीक्षांची तयारी करुन घेता येईल.

3) **सांस्कृतिक कार्यक्रम :**
विद्याल्यामध्ये विद्यार्थ्यांनीच्या कलागुणांना वाव मिळविण्यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. सांस्कृतिक कार्यक्रम व विविध स्पर्धा घेता येईल याकरिता सांस्कृतिक कक्ष स्थापन विद्यालयामध्ये आहे.

4) **मातीकाम व कागदकाम (कार्यानुभव) :**
प्रत्येक आठवड्यातील दोन दिवस मातकाम व कागदकाम हे उपक्रम विद्यालयामध्ये घेण्यात येते.

5) **सामाजिक व आरोग्य विषयक चर्चा :**
बालिका विद्यालयामध्ये दर महिन्याला विद्यार्थीनींची आरोग्य तपासणी केली जाते व सामाजिक दृष्टिकोन निर्माण होण्यासाठी सामाजिक क्षेत्रामध्ये उल्लेखनिय कार्य करणाऱ्या स्त्री यांच्या सामाजिक जीवनांचा आदर्श विद्यार्थीनींना चर्चात्मक सांगितला जातो.

6) **कथाकथन, काव्य, गायन व निबंध लेखन :**
बालिका विद्यालयातील विद्यार्थीनींसाठी विद्यालयामध्ये विविध बौद्धिक स्तरावरील उपक्रम घेतले जातात. त्यामध्ये कथाकथन, विविध विषयावर काव्य, गायन व आवडीच्या विषयाचा समावेश करुन कल्पनात्मक, रचनात्मक, सौंदर्यात्मक, ऐतिहासिक, सृजनात्मक विषयांवरील निबंध स्पर्धा विद्यालय घेत असतात. त्यामुळे विद्यार्थीनींच्या बौद्धिक विकासामध्ये भर पडते.

विद्यार्थीनींना शिक्षणाच्या माध्यमातून इतर कार्य करण्याची प्रेरणा निर्माण करता येईल तसेच स्वतःचे काम स्वतः करण्याची सवय लावणे व निर्णय क्षमता विकसित करणे हा या उपक्रमांचा उद्देश आहे. (थीम बेसड् वर्क) प्रत्येक theme (विषय) मध्ये काम करतील त्यांना वेगवेगळे अनुभव प्राप्त होतील व त्या अनुभवातून शिकण्याची संधी मिळेल. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील अध्ययन करणाऱ्या विद्यार्थीनींचा सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने खेळ व व्यायाम महत्वपूर्ण आहे. खेळाचा उपयोग अशा प्रकारे झाला पाहिजे की विद्यार्थीनींना जीवनामध्ये शिक्षणाबरोबरच खेळाचे महत्व पटले पाहिजे.

**व्यक्तिमत्वाचे विकास वाढविणारे टप्पे :**

1) **भौतिक वातावरण :**

कोणत्याही संस्थेचे भौतिक वातावरण त्या कार्याचे सिद्धांताचे नियमांचे व सुविधांचे प्रतिबिंब प्रगट करते. नवीन येणाऱ्या मुलींना प्रथम शाळेच्या भौतिक इमारतीचा परिचय होतो. KGBV हे असे केंद्र आहे, जेथे मुलींना शिक्षण, राहणीमान व व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने तयार केले जाते. म्हणून यासाठी केजीबीव्ही मध्ये भौतिक वातावरण याप्रकारे निर्माण केले जाते, ज्याद्वारे विद्यार्थीनींचे दर्जेदार शिक्षण, जीवनकौशल्य व व्यक्तिमत्व विकास होईल. नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थीनींना शालेय वातावरण पाहून प्रसन्नतेचा अनुभव येईल.

2) **स्वच्छता व निरोगी वातावरण :**

बालिका विद्यालयातील विद्यार्थीनींच्या व्यक्तिमत्व विकास होण्यामध्ये स्वच्छता व निरोगी वातावरणाचा मोठा सहभाग असतो. हे स्वच्छ व निरोगी वातावरण विद्यालय नियमित ठेवतात.

3) **माहिती फलक :**

महाविद्यालयामध्ये दैनंदिन परिपाठ, दिनविशेष, सुविचार विद्यालयामध्ये शिक्षण घेत असलेल्या मुलींची संवर्गनिहाय संख्या, नेत्यांच्या उल्लेखनीय बाबी, विविध सूचना माहिती फलकावर विद्यालयामध्ये दैनंदिन असतात.

4) **वर्गखोल्यांचा बहुउपयोग :**

1) स्वागत कक्ष : विद्यार्थीनींनी तयार केलेल्या चित्रकला, मातकाम, भेटकार्ड, लिहिलेल्या कविता, चारोळ्या इ. स्वरुपांच्या उपक्रमांचे प्रदर्शन करुन त्यांच्या मूल्यमापनाचे आयोजन विद्यालय करते. त्यासाठी बाह्य परिक्षकाची/प्रमुख पाहुण्याची नेमणूक केली जाते. त्यांना स्वागत कक्षात थांबण्याची व्यवस्था विद्यालय करते.

2) सांस्कृतिक कक्ष व वर्ग खोल्या : विद्यालयात उपलब्ध खोल्यांचे नियोजन करुन चित्रकला, संगीत, व्यवसाय प्रशिक्षण, सांस्कृतिक कार्यक्रम व विविध स्पर्धा घेता येईल याकरिता सांस्कृतिक कक्ष विद्यालयात व्यक्तिमत्व विकासासाठी स्थापन केला जातो.

5) **विद्यार्थीनींची निवास व्यवस्था :**

प्रत्येक निवास खोलीत कर्तृत्ववान महिलेचे नाव दिलेले आहे. प्रत्येक विद्यार्थीनींना 1 गादी, 1 उशी अभ्रासह, 1 बेडशीट, 1 चादर, 1 ब्लँकेट आहे. प्रत्येक विद्यार्थीनीला स्वतःचे सामान ठेवण्यासाठी लॉकर आहे. निवासव्यवस्थेच्या खिडकीला पडदे व मच्छर जाळी असते. विद्यार्थीनींचे मच्छरापासून संरक्षण होण्यासाठी व्यवस्था केलेली असते. प्रकाश व्यवस्था व पंखे पुरेशा प्रमाणात आहे. निवास खेलीमध्ये झाडू, कचरा सुपली व खोलीबाहेर एक कचरापेटी आहे. विद्यार्थीनींच्या निवासव्यवस्था स्वच्छ व निरोगी आरोग्यास प्रोत्साहन देण्यात येईल अशी व्यवस्था विद्यालयात केलेली आहे.

**बालिका विद्यालयातील विद्यार्थीनींच्या व्यक्तिमत्व वाढीसाठी राबविण्यात येणारे उपक्रम :**

1) स्पर्धा परीक्षा, 2) संगीत, 3) चित्रकला, 4) व्यवसाय शिक्षण, 5) संगणक शिक्षण, 6) शैक्षणिक सहल, 7) रचनात्मक लेख, 8) सहशालेय उपक्रम, 9) मातकाम, कागदकाम तसेच अन्य उपक्रम, 10) मुक्तांगण, 11) व्यायाम, 12) योगासन, 13) प्राणायाम, 14) खेळ, 15) रामरावण, 16) आंधळी कोशींबीर, 17) बोलो बहेना कितने हम, 18) मकान मालिक, किरायदार और जलजला, 19) पोपट बोलेल ते कर, 20) मार निशाना टांग पर, 21) फुग्यांचा खेळ, 22) लिगोरच्या, 23) झिम्मा, 24) लपंडाव, 25) चिरपी, 26) हत्तीची सोंड, 27) सुरपाट्या, 28) सापसिडी, 29) शिवणापाणी, 30) बर्फ पाणी, 31) तळ्यात मळ्यात, 32) आंगलट पांगलट इत्यादी आणि 33) शरीराच्या विभिन्न अंगाचा व्यायाम.

**सारांश :**

शिक्षणासाठी संप्रेषण आवश्यक आहे. विद्यालयात व कुटुंबात विद्यार्थीनींना विचार सुरु करण्याची संधी दिली जात नाही, न बोलणाऱ्या विद्यार्थीनींना आज्ञाधारक व शहाणे समजले जाते. त्यामुळे मुलींमध्ये संवाद कौशल्य निर्माण होत नाही. विद्यार्थीनींच्या भावना अभिव्यक्त होत नाही, संवाद नसल्याने ज्ञानात वृद्धी होत नाही. ज्ञानवृद्धी होण्यासाठी तार्किक विचार करण्याची सवय, संवाद करण्याची संधी मिळाली पाहिजे. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील अध्ययन करणाऱ्या विद्यार्थीनींच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने खेळ व व्यायाम महत्वपूर्ण आहे. खेळांचा उपयोग अशाप्रकारे झाला पाहिजे की, विद्यार्थीनींना जीवनामध्ये शिक्षणाबरोबर खेळाचे महत्व पटले पाहिजे. शाळाबाह्य मुलींच्या शिक्षणात व त्यांच्या बौद्धिक क्षमता व व्यक्तिमत्व विकासासाठी बालिका विद्यालयाचे मोलाचे योगदान आहे.

**सहाय्यक संदर्भ ग्रंथ :**

1) जिवन शिक्षण मासिक.
2) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक परिषद, मुंबई (कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय मार्गदर्शिका)
3) http://www.npegelkgbv.org
4) KGBV Research Journal.
5) कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय त्रैमासिक/वार्षिक अंक.